“मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी” जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत निधी उपलब्ध करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डिएपी-१०१५/प्र.क्र.३४७/का.१४८१,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक: २८ जानेवारी, २०१६

वाचा

शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रासयो २०१५/ प्र.क्र.१२/ योजना-९ दि. २८ ऑक्टोबर, २०१५

प्रस्तावना

शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रासयो २०१५/ प्र.क्र.१२/ योजना-९ दि. २८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये महाराष्ट्र राज्यातील न जोडलेल्या वाड्या- वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी राज्यात “मुख्यमंत्री ग्रामसडक योजना” सुरु करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.४ नुसार जिल्हा नियोजन समितीला प्रतिवर्षी उपलब्ध होणा-या निधीच्या १५ टक्के निधी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी, जिल्हा नियोजन समितीला रस्ते क्षेत्रासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीव्यतिरिक्त उपलब्ध करुन देण्यात येईल व याबाबतच्या स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) चा निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

संदर्भाधीन दि.२८ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता उपलब्ध होणा-या एकूण निधीपैकी १५ टक्के निधी राज्यात राबविण्यात येणा-या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यांनी त्यांना सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या वर्षाच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) आराखड्यांकरीता मंजूर होणा-या एकूण नियतव्ययातून १५ टक्के निधी “मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी” राखीव ठेवावा. सदर निधी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणा-या रस्तेविषयक योजनांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधी व्यतिरिक्त असेल.

२. सदर निधीबाबत योजनेचा प्रशासकीय विभाग म्हणून ग्राम विकास विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८१७१८२६९९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kirankumar Vasantrao Wahul

Digitally signed by Kirankumar Vasantrao Wahul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kirankumar Vasantrao Wahul
Date: 2016.01.28 17:44:44 +05'30'

(कि.व. वाहुल)

शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. शासनाचे मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये, सर्व,
७. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सर्व,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व,
९. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व,
१०. जिल्हा नियोजन अधिकारी, सर्व,
११. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी, का.१४८१-अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवड नस्ती (का.१४८१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.